
# विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक **VISHWA PANTHASTHA**

वर्ष : १ । अंक : १ । मार्च २०१८ (मासिक) । मूल्य ₹ 100 । AED 10 । US$ 2 www.panthasta.com



# तुम्ही पांथस्थ मध्ये सहभागी आहात का?
# पांथस्थ मध्ये तुम्ही सहभागी होऊ शकता.

तुम्ही यु ए ई, ओमान, कतार, बहरीन, सौदी, कुवेत, कॅनडा, जपान, भारतात कुठेही, अमेरिका, युरोप, रशिया, आफ्रिका या ठिकाणी राहत असाल तर पांथस्थ मध्ये लिखाण करू शकता, जाहिरात देऊ शकता, किंवा तुमच्या शहरात पांथस्थ चा संपर्क म्हणून काम करू शकता. जाहिराती व वार्षिक वर्गणी जमा करू शकता.

पांथस्थ मध्ये कुठल्या विषयावर लिहावे याबद्दल विचारणा होत आहे. म्हणून काही सूचना.

अनिवासी भारतीयांची, विशेतः आखाती मराठी भारतीयांची गरज म्हणजे प्रथम आखातात चांगली नोकरी शोधणे किंवा असलेली नोकरी बदलून दुसरी चांगली नोकरी बघणे, आखातात व्यवसाय धंदा करण्यासाठी माहिती व मार्गदर्शन मिळवणे, गावाकडे लक्ष देणे व घर घेणे, मुलांचे शिक्षण, सुट्टीत पर्यटन, आरोग्यविषयक सोयी सुविधा व सल्ला, डॉक्टरांची माहिती, करमणुकीचे व सांस्कृतिक कार्याक्रमाविषयी माहिती, सामाजिक उपक्रमाविषयी माहिती व त्यात सामील होण्याची संधी, या सर्व विषयांवर तुम्ही लिहू शकता. किंबहुना तुम्हीच लिहावे हि अपेक्षा.

पांथस्थ हजारो वाचकापर्यंत पोहोचणार आहे, तेव्हा हि संधी साधून तुम्ही तुमच्या व्यवसायाची, धंद्याची, उपक्रमाची, प्रोडक्ट्स, सर्विसेस, याची माहिती सर्वांपर्यंत पोहोवण्यासाठी छानशी जाहिरात देऊ शकता. जाहिरात तयार नसेल तर आम्ही ती तयार (डीझाईन) करण्यास मदत करू. तुमच्या व्यवसायाची जाहिरात प्रथम तुम्हीच केली पाहिजे. जे दिसते ते खपते हे लक्षात ठेवा.

आपल्या आसपास असलेल्या उद्योगाची व उद्योजकाची माहिती द्या. उद्योजकांनीदेखील स्वताहून पुढाकार घेऊन आपल्या उद्योगाची माहिती द्यावी. (मुलाखत चालेल). आखातात आहात, येण्याची इच्छा आहे, तेव्हा नेट वर्किंग करा, धन्देकी कुछ बात करो, कुछ पैसा जोडो.

परदेशात राहणाऱ्या भारतीयांची अजून एक समस्या म्हणजे त्यांना आपल्या मुलांसाठी किंवा मुलींसाठी योग्य स्थळ शोधण्यास अडचण येते. माहितीच मिळत नाही. यावर उपाय एकच. उपवर मुला / मुलींची माहिती द्या, त्यासाठी विशेष सेक्शन पांथस्थ मासिकात असेल.

तुम्हाला नोकरी हवी असेल किंवा असलेली नोकरी बदलायची असेल तरी पांथस्थ मध्ये छोटी जाहिरात द्या. तुमच्या कंपनीत तुम्हाला योग्य उमेदवार नोकरीसाठी हवा असेल तरी छोटी जाहिरात द्या.

कविता, मराठी गझल हि जरूर पाठवा.

तुम्ही ज्या ठिकाणी राहता आहात, त्याच्या आसपास चे प्रेक्षणीय स्थळे, सुट्टीसाठी कुठे जावे या बद्दल सूचना यावर लेख पाठवा. फोटो पाठवा. (माहिती बरोबर).

मुलांसाठी काही चांगले कोर्सेस, मुलांसाठी काही साहित्य, लिखाण पाठवा.

पैश्याचे नियोजन, कुठे वाचवावे, कुठे खर्च करावे यावर लिहा.

भारतातील सी ए (CA) नी संपर्क साधावा, NRI (विशेषतः आखातातील मराठी माणसासाठी) काही विशेष सेवा, सूचना असेल तर त्यावर लिहावे. (जाहिरात दिली तरी चालेल).

विविध (बिल्डर्स) बांधकाम व्यावसायिक यांच्या गृहयोजना चालू आहेत. त्यांनी पांथस्थ मध्ये जाहिरात व लेख दिला तर उत्तम.

भारतात (किंवा परदेशात) भारतीयांसाठी असलेल्या राहण्याच्या सोयी (बेड व ब्रेकफास्ट), पेईंग गेस्ट याबद्दल माहिती (जाहिरात) द्या.

विविध मराठी ग्रुप्स आहेत, त्यांनी आपल्या ग्रुप संबंधी माहिती द्या, उपक्रमांची माहिती द्या.

आपल्याला किंवा आपल्या ओळखीत कोणाला काही पुरस्कार मिळाला असेल किंवा काही चांगली उपलब्धता असेल तर त्याबद्दल लिहा.


तुम्हाला आलेला चांगला किंवा वाईट अनुभव सर्वांबरोबर शेअर करा, त्याबद्दल लिहा.

तुमच्या आसपास कुठला चांगला सामाजिक उपक्रम चालू असेल त्याबद्दल व त्यासाठी मदतीची गरज असेल, तर त्या बद्दल लिहा.

पांथस्थ त्रैमासिकाचे / मासिकाचे चे वितरण संपूर्ण जगभर करण्याचा प्रयत्न आहे, आपले सहकार्य अपेक्षित आहे. तुम्ही तुमच्या मंडळाची, ग्रुपची, कंपनीची, उपक्रमाची जर स्मरणिका काढणार असाल तर त्या साठी पांथस्थ मदत करेल. जमल्यास विशेष अंक देखील प्रकाशित करता येईल.

लेखकांसाठी: मराठी टाइप करता येत नसेल तर हाताने लिहून (स्कॅन करून) लेख पाठवला तरी चालेल. तुम्हाला काही विशेष सूचना करायच्या असतील तर त्याचे स्वागतच आहे.


ई मेल editor panthastha .com



# विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक **VISHWA PANTHASTHA**

संपादक : **डॉ. संदीप कडवे**




# विश्व पांथस्थ

**विश्व पांथस्थ**
वर्ष १, अंक १
मार्च २०१८

अनिवासी भारतीयांसाठीचे पहिले मराठी मासिक

व्यवस्थापकीय संपादक
**संदीप वसंतराव कडवे**

संपादकीय साहाय्य
**श्री. राजन तावडे,** अबू धाबी
**श्री. गजानन खोलगाडे,** बहरीन

मांडणी
**संवाद ट्रेडप्रिंटस्,** पुणे

**मूल्य : ₹ 100 | AED 10 | US$ 2**

**Vishwa Panthastha**
Volume 1, Issue 1
March, 2018

First Marathi Monthly For NRI Maharashtrians

Managing Editor
**Sandeep Vasantrao Kadwe**

Editorial Support
**Rajan Tawade,** Abu Dhabi
**Gajanan Kholgade,** Bahrain

Design
Sanwad Tradeprints, Pune

**Price : ₹. 100 | AED 10 | US$ 2**

विश्व पांथस्थ' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक संदीप वसंतराव कडवे यांनी विक्रम प्रिंटर्स प्रा. लि. ३१ व ३४, पर्वती इंडस्ट्रियल इस्टेट, पुणे-सातारा रोड, पुणे - ४११०३७ येथे छापून , ए-७०३, निसर्ग सिटी-२, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे ४११ ०५७, येथून प्रसिद्ध केले.
संपादक* - संदीप वसंतराव कडवे
(*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)

'Vishwa Panthastha' monthly publication is owned, printed & published by Sandeep Vasantrao Kadwe, Printed at Vikram Printers Pvt. Ltd., 31& 34, Parvati Industrial Estat, Pune-Satara Road, Pune - 411037 And published at A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune – 411 057.
Editor * - Sandeep Vasantrao Kadwe.
(* Responsible for selection of news and articles under the PRB Act.)

# अनुक्रमणिका


- निराधार अनिवासी.........................................................................४
- गावातील शिमगोत्सव.....................................................................५
- बजेट क्या है?...............................................................................७




## सं पा द की य

# निराधार अनिवासी ?



**डॉ. संदीप कडवे**
संपादक, विश्व पांथस्थ

अनिवासी असे बिरूद लावलेल्या भारतीयांनी कायम भारताबाहेरच राहावे असा काही अलिखित नियम आहे का? सरकारदरबारी तरी तशीच अपेक्षा दिसते. खुपदा अनिवासी भारतीयांची नोकरी जाते, ते तात्पुरते भारतात येतात, काहींचे भारताबाहेर व्यवसाय असतात परंतु भारतात त्यांचा बहुतांशी वेळ जातो, त्यामुळे, १८२ दिवसांची अट ते किती पूर्ण करतात या बाबत शंकाच आहे. आयकर चुकवण्यासाठी म्हणून कित्येक (बहुधा अमराठी) व्यापारी दोन वेगळी खातेवही (accounts) ठेवत असत, तसे आता कर्ज घेऊन, घोटाळे करून पळून जाण्यासाठी काही बुद्धिमान दोन पासपोर्ट बाळगतात कि काय अशी शंका येते. पण ते झाले असाधारण अनिवासी भारतीय. सर्वसाधारण पापभिरू अनिवासी भारतीय मात्र न घरका न घाट का असाच आहे.

मुद्दा अनिवासी भारतीय याच्या व्याखेबाबत आहे. एका वर्षात १८२ दिवसांपेक्षा जास्त दिवस भारतात राहिले तर अनिवासी भारतीयाचा निवासी भारतीय होतो. त्याला तसे सरकारदरबारी जाहीर करावे लागते व भारतीय उत्पन्नावर कर द्यावा लागतो. अर्थात या नियमाची अंमलबजावणी कोण व किती काटेकोरपणे करतो हा देखील एक वादाचा मुद्दा आहेच. म्हणजे असे कि असंख्य निवासी भारतीय विविध परदेशांचे देखील अधिकृत पारपत्र धारक किंवा 'विसा धारक असतात. सोयीनुसार त्यांचे स्टेटस हे NRI ठरते. नीरव मोदी व इतर अनेक प्रकरणात ही बाब ठळकपणे लक्षात आली. मुळातच एकाच वेळी दोन देशांचे पारपत्र ठेवणे आता भारतापुरते तरी बेकायदेशीर आहे कि नाही या बाबतीत सरकारने स्पष्टीकरण द्यावे. त्यातही आयकर विभागाकरता NRI ची वेगळी व्याख्या, विदेश विभागाकरता वेगळी, RBI व बँकेकरता वेगळी व शेवटी आधार कार्ड करता वेगळी व्याख्या अशी गुंतावळ झाली आहे. भारत सरकारने अनेक ठिकाणी आधार कार्ड अनिवार्य केले आहे. मोबाईल साठी तर नक्कीच. बँकेला भारतीय मोबाईल नंबरच लागतो. ज्याचे भारतात घर आहे त्या NRI न ऑनलाईन वीज बिल, घरपट्टी भरतांना अडचण येते, कारण, भारतीय बँकांनी दिलेले क्रेडीट किंवा डेबिट कार्डच व भारतीय मोबाईल नंबरच बहुधा त्यासाठी स्वीकारले जाते व त्यासाठी आधार कार्ड अनिवार्य आहे. घर विकत घेतांना / देतांना, पंजीकरण करतांना, कित्येक सरकारी किंवा निमसरकारी सेवा स्वीकारतांना मुख्यतः आधार कार्डची व प्रसंगी PAN नंबर ची मागणी केली जाते. मुळातच अनिवासी भारतीयांना आधार कार्ड अनिवार्य नसतांना किंबहुना NRIने आधार कार्ड काढणे हे एक प्रकारे अनधिकृत असताना अशी सक्ती का ? आणि सक्ती करायचीच असेल तर परदेशात राहून भारतीय वकिलातीतून आधार कार्ड काढण्याची व्यवस्था सरकारने का अधिकृत करू नये ? किंबहुना तशी व्यवस्था झाली तर असंख्य निराधार अनिवासी भारतीयांना आधार मिळेल व त्याची नाव कुठल्या तरी एका तीराला लागेल अशी अपेक्षा करूया. त्यापाठोपाठ मग ओघानेच सध्या कागदावर असलेल्या मतदानाचा अधिकार बजावण्याची देखील सरकारी व्यवस्था Consulate किंवा Embassy किंवा परदेशातील पासपोर्ट सेवा केंद्रा च्या माध्यमातून भारतीय पारपत्रधारक अनिवासी भारतीयांसाठी निर्माण होईल व त्यांना लोकशाहीने दिलेला आपला मतदानाचा पवित्र हक्क बजावता येईल अशी अपेक्षा करूया. तो सुदिन जानेवारी २०१९ पूर्वी उजाडला तर अनिवासी भारतीयांसाठी ती एक अच्छे दिन ची सुरवात असेल हे मात्र निश्चित. ■



# गावातील शिमगोत्सव...

लेखक – मंगेश आलीम, दुबई

वर्षातून दोनवेळा माझं गाव गजबजत ते म्हणजे एकदा गणेशोत्सवात आणि शिमग्याच्या दिवसात. गणपतीनंतर गावात नवचैतन्य आणणारा सण म्हणजे होळी. या दोन ही वेळी मुंबईचे चाकरमानी अगदी आवर्जून हजेरी लावतात.'रे पोरा घराशीक आठव,

पाच तरी रुपये पाठव.'

असं बापाला मुलाला पत्र पाठवण्याची गरज भासत नाही. शिमगा म्हटल्यावर बायकापोरांसकट, पैसे गाठीक बांधून तो गावाला निघालेला असतो. खऱ्या अर्थाने हा लोकोत्सव असतो. लोकांनी लोकांसाठी लोकांकरता साजरा केलेला सण. भट–बामणांचा आधार न घेता! पूजाअर्चा मानकरी असलेल्या कुणबी, मराठ्यांनीच करायची. शिमग्याला भटजी लागत नाही. प्रत्येक गावानुसार हा सण वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो.मुंबईत होळीचं महत्त्व फक्त एकाच दिवसांच असतं. पण माझ्या गावात मात्र त्या आधीपासूनच म्हणजे फाल्गुन पंचमीपासून होळीला सुरुवात होते.

हा सण सुमारे ५ ते १५ दिवस असतो. प्रथेप्रमाणे फाल्गुन शुद्ध द्वादशी /त्रयोदशी किंवा पौर्णिमेला होळीचा मुख्य दिवस असतो. शिमगोत्सावाची सुरुवात होते ती ग्रामदैवत देवाच्या मंदिरात. देवाला कौल लागतो कौल मिळाला कि उत्सवाला सुरुवात होते.

होळी कुठून आणायची हे अगोदर पासूनच ठरलेलं असतं.

सगळा गाव मिळून सूरमाडाची प्रचंड होळी उचलत आणि नाचवतच आणि अगदी धावतच वर्षानुवर्षाच्या गावाच्या निश्चित केलेल्या जागी म्हणजे मांडावर आणली जाते.

हे काम खूप जिकिरीचे आणि जबाबदारीचे असते. सुमारे ५०–७० फूट उंचीचे, आणि सुमारे १२००–१५०० किलो वजनाचे झाड तोडून ते गावकरी खांद्यावरूनढो लताशाच्या गजरात, नाचत, गात आणतात. शेकडो हात एकत्र येतात आणि होळी उभी केली जाते. इतकी मोठी होळी पाहता पाहता लिलया उभी राहते. मग होम केला जातो , गावातील नवीन जोडपी या होमात नारळ देतात .तो एक महत्त्वाचा विधी असतो.

होळी झाल्यानंतर सगळ्यात महत्त्वाची परंपरा म्हणजे उत्सवाची पालखी ही होय. पालखीत देवांचे मुखवटे लावले जातात आणि देवाला नवीन वस्त्र नेसवली जातात, मुखवट्यांना सजवले जाते. शेकडो वर्ष जुने दागिन्यांनी ग्रामदेवता सजते. याला देवाला 'रूपं लावणे ' असं म्हंटले जाते. कुलदैवत, ग्रामदैवत, यांचे स्मरण व पूजन केले जाते.

ग्रामदेवतेच्या मंदिरातून ग्रामदेवतेची पालखी निघते. पालखी निघाली की अख्खा गाव तिच्या मागे. पालखी उचलायची कुणी, ती कुठल्या वाडीतून न्यायची, ती कुठे प्रथम थांबवायची, जागरण कुठे, जेवण कुठे, खेळे कुठे हे सारं ठरलेलं

असतं. घरोघरी अंगण शेणाने सारवून सज्ज. घराला तांबडा लखलखीत रंग आणि त्यावर चुन्याच्या नक्षी. पक्ष्याच्या, प्राण्याच्या, फुलांच्या, वेलींच्या. भांडीकुंडीही घासून स्वच्छ. नवा भात गिरणीला लावून आणलेला. वस्तीसाठी आलेला देव आणि त्याबरोबरची वाडीवरच्या माणसांच्या जेवणाची तयारी.

'देव उपाशी नाय गेला पायजेल, माझ्या दारातून.

भलं वरीसभर मी उपाशी राहीन, पण देवाचं पॉट रिकामी राहिलं नाय पायजेल...'

खरंतर देव जेवणार नसतो. देवाच्या निमित्ताने गाव जेवणार असतं आणि देवालाच तो गावाच्या रूपाने बघत असतो.

दिवसभर हि पालखी प्रत्येकाच्या घरी जाते याला 'घर घेणे ' असं म्हणतात. पालखी म्हणजे प्रत्यक्ष देवच आपल्या घरी येत असतो. याचा आनंद काही वेगळाच असतो. पालखी घरी आल्यावर घरातल्या सुवासिनी,माहेरवाशिणी खणा–नारळाने ओटी भरतात. तिच्यापुढे नवस बोलतात. मृदंगच्या थापेवर नवीन लग्न झालेल्या जोडप्यांची लग्नाची 'वाणकरणी' म्हटली जाते. 'वाणकरणी' म्हणजे काव्य स्वरूपात टाळ–मृदंगच्या गजरात नवविवाहीत जोडप्यांसाठी देवापुढं गाऱ्हाणं घातलं जात.

शिमगोत्सावात रंग भरतात ती इथली पारंपारिक वाद्य, ढोल, ताशा, मृदंग आणि याचवेळी साऱ्या दिवसांत खेळे, नमन, सोंगे, गोमू च्या गाण्यांनी सार गाव गजबजून जातं. सारं गाव होळीच्या उत्साहात रंगलं असत. स्त्रीच्या वेषातला पुरुष, राधा मुदृंगाच्या तालावर फेर धरते. हाताच्या तालावर पायांना नाचावत गिरकी घेत राधा गाते.

राधा, नमन वाल्यांचा मान द्यावाच लागतो.

तर, गावातली पोरंटोर,दिवसभर ठरलेली घरं घेऊन झाली की संध्याकाळी पालखी आपल्या जागेवर म्हणजे पुन्हा मांडावर येते. त्यानंतर पालखी नाचवण्याचा कार्यक्रम सुरू होतो. त्यास 'पालखी खेळवणे' असे म्हणतात. लाकडी कोरीव अशी ही पालखी शंभर दोनशे किलोची, पण एखाद्या 'सिंगल फसली' माणसं एका खांद्यावरून दुसऱ्या खांद्यावर, डावीकडून उजवीकडे, चारही दिशांना गोल गोल नाचवू लागली की थक्क व्हायला होतं. ढोल, ताश्यांच्या आवाजात पालखी कधी डोक्यावर,खांद्यावर अशी खेळवली जाते. आणि मुख्य म्हणजे या पालखीतील देव जराही हलत नाही.

होळीच्या शेंड्याखाली संपूर्ण गावाच्या साक्षीने उभे राहून गार्हाणे घातले जातात ज्यात मागच्या वर्षीचे नवस फेडणे आणि यावर्षी नवीन नवस करणे असा प्रकार असतो. त्यानंतर बैठक(गावची सभा) असते, ज्यात महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होते.

काही गावात पालखीने खुणा काढणे हा कार्यक्रम असतो ,यामध्ये गावचा गुरव आदल्या रात्री एक नारळ सहाणे समोर पटांगणात जमिनीत लपवून ठेवतो. तो नारळ पालखी हुडकून काढते. हा कार्यक्रम देखील पाहण्यासारखा असतो. मोकळ्या चव्हाट्यावर एक ठिकाणी नारळ पुरला जातो आणि तो पालखीने शोधून काढायचा. खुल्या मैदानात पालखीच्या नाचाला उधाण येते... खांदेकरी अशा काही किमयेने पालखी नाचवतात की एक क्षण आपल्याला वाटते की ती निसटणार तर नाही, पण हवेत हलकाच झोक घेत ती पुन्हा खांद्यावर स्थिरावते तेव्हा काळजात कुठेतरी धस्स झालेलं असतं. अचानक मोराच्या पिसासारखी भासणारी पालखी जड जड होत जाते आणि खांदेकरांच्या तालावर नाचण्याऐवजी तीच त्यांना घुमवायला सुरुवात करते. खेचत खेचत खांदेकऱ्यांनाच पालखी नारळ पुरलेल्या ठिकाणी घेऊन जाते आणि तिचा खूर आपटला जातो... पुरलेला नारळ सापडतो!

खरंच !! डोळ्यांचं पारणं फेडणारा असा हा उत्सव असतो.

कदाचित या परंपराच या गावाच्या समाज व्यवस्थेचा कणा असतात. यामुळेच कोकणातील प्रत्येक गावात वर्षानुवर्ष साजऱ्या होणाऱ्या या शिमगोत्सवाच्या उत्साहात कुठे कमतरता येत नाही.

शिमगोत्सवात वैशिष्ट्यपूर्ण असतात ते गावातील मानपान. इथेही प्रत्येकाचा परंपरेने आलेला मान ठरलेला असतो आणि तो प्रत्येक जण पाळतो. शिमगोत्सव म्हंटला की अनेक मानापमान आणि वाद हे ओघानं आलंच. गावात दोन गट असले तरीही होळीच्या आधी एकमेकांच्या नावानं शिमगा करणारी गावातली माणसं या सोहळ्याला मात्र मनापासून एकत्र येतात.

हा शिमगोत्सव गुडीपाडवा येईपर्यंत चालू असतो. गुडीपाडव्याला देवाला जी रूपं लागलेली असतात ती उतरवली जातात आणि इथे शिमग्याची सांगता होते.

तर असा आहे माझ्या गावतील शिमगोत्सव !

शिमगोत्सव हा सांगायचा नाही तर अनुभवाचा उत्सव आहे.

गावकरी आणि चाकरमानी यांच्या साथीने गावातील संस्कृती अनुभवायला एकदा तरी शिमग्याला माझ्या गावात याच !

# बजट क्या है?



संविधान में 'बजट' शब्द का जिक्र नहीं है जिसे बोलचाल की भाषा में आम बजट कहा जाता है उसे संविधान के आर्टिकल 112 में एनुअल फाइनेंशियल स्टेटमेंट कहा गया है। फाइनेंशियल स्टेटमेंट अनुमानित प्राप्तियों और खर्चों का उस साल के लिए सरकार का विस्तृत ब्योरा होता है।

आम बजट में सरकार की आर्थिक नीति की दिशा दिखाई देती है। इसमें मंत्रालयों को उनके खर्चों के लिए पैसे का आवंटन होता है। बड़े तौर पर इसमें आने वाले साल के लिए कर प्रस्तावों का ब्योरा पेश किया जाता है।

आम बजट में क्या शामिल होता है? :

बजट डॉकेट में करीब 16 दस्तावेज होते हैं, इसमें बजट भाषण होता है। इसके अलावा हरेक मंत्रालय के खर्च प्रस्तावों का विस्तृत ब्योरा होता है। साथ यह रकम कहां से आएगी, इसके प्रस्ताव भी बजट में बताए जाते हैं।

फाइनेंस बिल और एप्रोप्रिएशन बिल भी इस डॉकेट में शामिल होते हैं। फाइनेंस बिल में अलग-अलग टैक्सेशन कानूनों में प्रस्तावित संशोधन होते हैं। जबकि एप्रोप्रिएशन बिल में सभी मंत्रालयों को होने वाले आवंटनों का लेखा-जोखा होता है।

वित्त मंत्री के बजट भाषण में दो हिस्से होते हैं। पार्ट ए और पार्ट बी। पार्ट ए में हर सेक्टर के लिए आवंटन का मोटे तौर पर जिक्र होता है। इनके लिए सरकार की नई योजनाओं का ऐलान होता है। इस तरह से इससे सरकार की नीतिगत प्राथमिकताओं का पता चलता है। पार्ट बी में सरकार के खर्च के लिए पैसा जुटाने के लिए टैक्सेशन के प्रस्ताव होते हैं।

संसद में बजट पेश किए जाने के बाद क्या होता है? :बजट भाषण के पढ़े जाने के बाद बजट उपायों पर एक आम चर्चा होती है। बहस में हिस्सा लेने वाले सदस्य बजट के प्रस्तावों और नीतियों पर चर्चा करते हैं। इस आम-चर्चा के बाद संसद आमतौर पर करीब तीन हफ्तों की छुट्टी पर चली जाती है। इस दौरान विभागों की स्थायी समितियां मंत्रालयों के अनुमानित खर्चों का विस्तार से अध्ययन करती हैं, इन्हें डिमांड्स फॉर ग्रांट्स (अनुदान मांग) कहा जाता है।

समितियां इसके बाद हरेक मंत्रालय की डिमांड्स फॉर ग्रांट्स पर अपनी रिपोर्ट जमा करती हैं। समितियों के रिपोर्ट जमा कर देने के बाद इन अलग-अलग मंत्रालयों की अनुदान मांगों पर लोकसभा में चर्चा और वोटिंग होती है। बजट पास होने की अंतिम तारीख तक जिन डिमांड्स पर वोटिंग नहीं हो पाती है उन सभी पर एकसाथ वोटिंग हो जाती है।

समितियां हरेक मंत्रालय की डिमांड्स फॉर ग्रांट्स पर रिपोर्ट जमा करती हैं और अनुदान मांगों को एप्रोप्रिएशन बिल में समाहित किया जाता है। इसे संसद से पास किया जाना जरूरी है। तभी सरकार द्वारा पारित खर्चों के लिए कंसॉलिडेटेड फंड से रकम की निकासी मुमकिन हो सकती है। अंत में फाइनेंस बिल पर वोटिंग होती है। फाइनेंस बिल के पास होने के साथ बजटीय प्रक्रिया समाप्त हो जाती है।

बजट में वित्तीय प्रावधानों पर लोकसभा की ज्यादा भूमिका होती है और यहां मंत्रालयों की मांगों पर चर्चा होती है। राज्यसभा में मंत्रालयों के कामकाज पर चर्चा होती है। मंत्रालयों के कामकाज की बहस में मंत्रालयों के कामों, उनकी उपलब्धियों, भविष्य के रोडमैप और खामियों की चर्चा की जाती है।

■ संकलित

**FORM IV**

Statement about ownership and other particulars about newspaper VISHWA PANTHASTHA to be published in the first issue every year after the last day of February

1. Place of publication : A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune – 411 057.
2. Periodicity of its publication : Monthly
3. Printer's Name : Sandeep Vasantrao Kadwe

Nationality : Indian

Address : A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune – 411 057.

4. Publisher's Name : Sandeep Vasantrao Kadwe

Nationality : Indian

Address : A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune – 411 057.

5. Editor's Name : Sandeep Vasantrao Kadwe

Nationality : Indian

Address : A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune – 411 057.

6. Names and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding More than one per cent of the total capital.

Sandeep Vasantrao Kadwe

A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune – 411 057.

I, Sandeep Vasantrao Kadwe, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Sd/-

Date : 15 March 2018 Signature of Publisher

प्रिय अनिवासी मराठी भारतीय,

पांथस्थ हे त्रैमासिक खास तुमच्या साठी सुरु केले आहे. दुबई मधून प्रकाशित होणारे अश्या प्रकारचे हे पहिलेच त्रैमासिक आहे. आखातात किती मराठी मंडळी आहेत, किंवा जगभर किती मराठी मंडळी वास्तव्य करत आहेत याचा अंदाज घेण्यासाठी आता पांथस्थ तर्फे आपण सर्वांची माहिती गोळा करण्याचे ठरवले आहे. फक्त संयुक्त अरब अमिराती मध्ये २ लाख मराठी भारतीय असावेत असा अंदाज आहे. त्यांच्या विविध गरजा आहेत, मते आहेत. पांथस्थ ने हा उपक्रम त्यांच्यासाठीच चालू केला आहे. आपली माहिती येथे भरून द्या म्हणजे आम्हाला या माहितीचे सविस्तर विश्लेषण करता येईल. रजिस्ट्रेशन केलेल्या सदस्यांची मोजकीच माहिती www.panthastha.com या वेब साईट वर तुम्हाला बघता येईल. तुम्ही या वेब साईट वर जाऊन तुमच्या मित्र परिवाराची देखील माहिती ऑन लाईन भरू शकता. माहिती खरी व सध्याची असावी. या द्वारे मग आम्ही तुमच्याशी संपर्क करून विविध उपक्रमांबद्दल, काही जरुरी विषयांबद्दल तुम्हाला माहिती देऊ शकतो तसेच तुमचे मत विविध विषयांवर जाणून घेऊ शकतो. तेव्हा या उपक्रमात नक्कीच सामील व्हा व पांथस्थ परिवाराचा एक सदस्य म्हणून कार्यरत व्हा. तुमच्या सहकार्यासाठी अनेक धन्यवाद.

editor@panthastha.com
Editor and Team Panthastha

विश्व पांथस्थ

## FORM FOR REGISTRATION

- Name : ______
- Date of Birth: [ ]
- Sex: Male [ ] Female [ ]
- Marital Status: Married [ ] Unmarried [ ]
- Education: ______
- Profession: ______
- Mobile: [ ] [ ]
- Email: ______
- PO Box: ______ Emirate: ______
- State: ______
- Country of Residence: ______

- How long you have been staying abroad? : ______
- How long you are staying in this country? : ______
- Which is your native place in India? : City ______ State ______
- Where do you currently stay in India, when you go for vacation? :

  City ______ State ______
- If Married, are you staying with your family abroad?: Yes [ ] No [ ]
- If you are staying alone abroad, where does your family stay : ______
- Number of Children : Son [ ] Daughter [ ]
- Would you like to subscribe to Vishwa Panthastha Magazine? : Yes [ ] No [ ]
- Would you like to be associated with various social projects we may undertake in future? : Yes [ ] No [ ]

We thank you for your providing above authentic information.

**editor@panthastha.com**
**Email: member@panthastha.com**
**PO Box 85489, Dubai**

Vishwa Panthastha - RNI CR No. MAHBIL/2016/69261




# Lets work... together... today...
# for a better tomorrow

Turnaround, Strategy Consulting, Project Incubation,
Vision Mission Definition Workshops, CEO Coaching,
Market Research and Feasibility Study, Business Plan and Project Reports,
Corporate and Capital Structuring, Cash Flow and Financial Reengineering,
Due Diligence and Business Valuation, Equity and Debt Syndication,
HR Training and Talent Search, Efficiency Improvement Audits
Joint Venture, M&A and Private Equity Placements

**MITCON**
**International**

**Management I Investment I Technology I Consulting**

Email : ceo@mitcon.ae